Maharashtra State
Board of Secondary & Higher
Secondary Education,
Nashik Divisional Board, Servey
No.1560/1, Adgaon Shivar, Near
New English School Adgaon,
Nashik 422003

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण
मंडळ, नाशिक विभागीय
मंडळ, सर्व्हे नं.१५६०/१,
आडगाव शिवार, न्यू इंग्लिश स्कूल
आडगाव जवळ,नाशिक ४२२००३

Tel(0253)- 2950410,2945241,2945251 Email :nsksec@rediffmail.com

महत्वाचे/कालमर्यादित

क्र.नाविमं/माध्य.ब-१/ 4197
नाशिक ४२२००३
दि.२७/०२/२०२४
28

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेतील
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

विषय – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा(इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) मार्च २०२४ च्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत..

संदर्भ –१.शासन निर्णय उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ दि.२० डिसेंबर, २०१८.
२. क्र.रा.मं./परीक्षा-७/६७११ दि.१२/१२/२०२२

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून कळविण्यात येते कि, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा(इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) मार्च २०२४ च्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांनासवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत सुधारित कार्यपद्धतीशासनाने निर्गमित केलेली आहे.

खेळाडू विद्यार्थ्यांना द्यावयाची गुणांची सवलत मार्च २०१९ च्या परीक्षेपासून लागू करण्यात आलेली आहे.तथापि इयत्ता १२ वी पूर्वी विद्यार्थ्याने प्राविण्य मिळविलेले असेल तरी त्या विद्यार्थ्याने इ.१२ वी मध्ये क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक राहील. (या खेळाडू विद्यार्थ्याने इ.६ वी ते इ.१० वी या कालावधीत प्राविण्य मिळविलेले असेल व याकरिता असलेले सवलतीचे गुणांचा लाभ एकदा घेतला असेल तर त्याला पुन्हा इ.१२ वी करिता याचा लाभ घेता येणार नाही तथापि या खेळाडू विद्यार्थाने इ.११ वी व इ.१२ वी मध्ये प्राविण्य/सहभाग घेतला असेल तर त्याला शासन निर्णयातील परिशिष्ठ ६ प्रमाणे गुण अनुज्ञेय आहेत.)

उपरोक्त शासन निर्णय विभागीय मंडळाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संदर्भ क्र.२ च्या राज्य मंडळाच्या पत्रानुसार खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रकाराच्या प्रस्तावांच्या छाननीसाठी प्रती विद्यार्थी रु.२५/- (रु.पंचवीस फक्त) छाननी शुल्क म्हणून शाळा/कनिष्ठ महाविद्यालयानी प्रस्ताव सादर करत असतानाच विभागीय मंडळाच्या नावे चलनाद्वारे किंवा रोखीने भरणा करून क्रीडा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे विभागीय मंडळाच्या नावे रक्कम भरणा केलेल्या बँक चलनाची/रोख पावतीची प्रत जोडूनच प्रस्ताव सादर करावेत.

तरी संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करून त्यामध्ये सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच निकाल विहीत कालावधीन लावणे मंडळास शक्य व्हावे, यासाठी <u>शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परिपूर्ण प्रस्ताव दिनांक ५ एप्रिल, २०२४ पर्यंत</u> जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावे.

(मोहन देसले)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव –
१.जिल्हा क्रीडा अधिकारी,
नाशिक,धुळे,जळगाव,नंदुरबार – क्रीडा वाढीव गुण सवलत प्रस्तावांची छाननी करून प्रस्ताव दि.३० एप्रिल,२०२४ पर्यंत मंडळ कार्यालयास शिफारशीसह सादर करावेत.
२.शिक्षणाधिकारी(माध्यमिक)-
नाशिक,धुळे,जळगाव,नंदुरबार – आपणही आपल्या स्तरावर परिपत्रक काढावे. शाळांनी प्रस्ताव विहित मुदतीत (०५ एप्रिल, २०२४) जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे जमा करण्याबाबत आदेशित करावे.